**<u>आर.सी.सी.क्र.३०५/२०२३</u>**

**सरकार वि. वसिम शेख**

**नि.क्र.४०**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा</u>.**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – अंजुम वसिम शेख,

वय – २१ वर्षे, व्यवसाय - घरकाम,

राहणार – हसनापुर, ता. शेवगाव, जि.अहमदनगर

<u>सरतपासणी सहा. सरकारी वकील **श्रीमती पी.आर.गिते यांचेमार्फतः**</u>–

१. आरोपी क्र. १ माझे पती असुन उर्वरित आरोपी क्र.२ व ३ हे माझे सुासु सारे, आरोपी क्र.४ दिर व आरोपी क्र. ५ ननंद, आरोपी क्र.६ नंदाई व आरोपी क्र.७ हे आरोपी क्र.६ चे वडील आहेत.

२. दि.१२.१०.२०२१ रोजी माझे आरोपी क्र.१ सोबत हसनापुर, ता.शेवगाव येथे लग्न झाले होते. लग्नानंतर मी आरोपी क्र.१ यांच्याकडे नांदण्यासाठी महाकाळा, ता.अंबड, जि.जालना येथे गेले. माझे व पती दरम्यान व्यवस्थीत संवाद होत नव्हते. माझे व आरोपीदरम्यान किरकोळ कारणांवरुन वाद झाले होते. याव्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. मी गैरसमजुतीतुन फिर्याद दाखल केली होती. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकुराविषयी मला काहीही माहिती नाही. सर्व आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

***(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर करण्यात आली).***

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या कडे घर बांधण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी करुन मला मारहाण केली व माझा शारिरीक व मानसिक छळ केला. हे म्हणणे खरे नाही

की, दि.०३.०६.२०२३ रोजी मी वडीलांकडुन पाच लाख रुपये आणत नसल्याने आरोपींनी मला घरातुन हाकलुन दिले. आता साक्षीदारास फिर्यादीतील अधोरेखीत भाग 'अ' वाचुन दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी फिर्यादीतील अधोरेखीत भाग अ माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदवुन घेतला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्या मध्ये वाद मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचवण्यसाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.ए.बी.शेख यांचेमार्फतः-

उलटतपासा नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृति

KULKARNI DATTATRAYA RAMESH Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH Date: 2026.03.10 12:59:38 +0530

दिनांक-१०.०३.२०२६

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी,
(कोर्ट नं.३) शेवगाव.